# भारती विद्यापीठ, पुणे

( संस्थापक - माननीय कुलपती डॉ. पतंगराव कदम )

# स्कूल ऑफ परफॉरमिंग आर्टस

## प्रमाणपत्र परीक्षा

भारती विद्यापीठ अंतर्गत

शास्त्रीय नृत्य

# कथ्थक अभ्यासक्रम

प्रारंभीक ते उच्च पदविका भाग २



**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

## प्राथमिक परीक्षा

**एकूण गुण - ५०** **परीक्षेचा कालावधी – १५ मि.**

**किमान गुण – १८**

---

**सैद्धांतिक :-** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक विषयाचा अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी तोंडी परीक्षेत विचारण्यात येईल.

१) कथक नृत्याची थोडक्यात माहिती

२) स्वतःची, गुरूंची व संस्थेची थोडक्यात माहिती

३) त्रितालची माहिती – सम, मात्रा, टाळी, काल/खाली, खंड, विभाग आणि ठेका

४) व्याख्या : लय, विलंबित लय, मध्य लय, द्रुत लय, मात्रा, सम, टाळी, काल/खाली, खंड.

**प्रात्यक्षिक :-** **एकूण गुण – ३५**

१) त्रितालच्या १६ मात्रा, आकड्यांमध्ये टाळी, काल दाखवून बराबर, दुगून, चौगुन मध्ये म्हणणे.

२) त्रितालचा ठेका टाळी, काल दाखवून बराबर, दुगून, चौगुन मध्ये म्हणणे.

३) त्रिताल मध्ये खालील रचना हातावर टाळी व कालासहित म्हणून दाखवणे आणि प्रस्तुत करणे.

साधा तोडे ६, चक्रदार तोडे २, तिहाई २, ततकार – त्रितालची बराबर आणि दुगुन

**सूचना –**

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- या परीक्षेसाठी प्रत्यक्ष तबल्याची/डिजिटल ठेकयाची/ मेट्रोनोमची साथसंगत ऐच्छिक.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

**+-+-+-+**

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**<u>प्रमाणपत्र परीक्षा – भाग १</u>**

**एकूण गुण – ७५** **परीक्षेचा कालावधी – २०मि.**

**किमान गुण – २७**

---

**सैद्धांतिक:-** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक विषयाचा अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी तोंडी परीक्षेत विचारण्यात येईल.

१) व्याख्या सांगा : लय, विलंबित लय, मध्य लय, द्रुत लय, तिहाई, गतपलटा,गतनिकास, बाँट.

२) दादरा, केहरवा तालाची संपूर्ण माहिती (सम, मात्रा, टाळी, काल/खाली, खंड, विभाग आणि ठेका)

३) काललिपीची महत्वाची चिन्हे (भातखंडे काललिपीप्रमाणे)

४) ५ ज्येष्ठ कथक गुरूंची नावे

५) अभिनयदर्पणनुसार खालील असंयुक्त हस्तमुद्रा दाखवून त्यांचे प्रत्येकी ३ उपयोग : पताका, त्रिपताका, अर्धपताका, कर्तरीमुख, मयूरहस्त, अर्धचंद्र, अराल, शुकतुंड, मुष्टी, शिखर, कपित्थ, कटकामुख, सूची, चंद्रकला, पद्मकोष.

**प्रात्यक्षिक :-** **एकूण गुण – ६०**

१) ताल त्रिताल :

अ) थाट - २ ब) साधा आमद - १ क) तोडे - ६

ड) चक्रदार तोडे – २ इ) परण – २ फ) तिहाई - १

२) गतनिकास - सीधी गत, मटकी गत, बाँसुरी गत.

३) ततकारची बराबर, दुगून, चौगुन, तिहाई सहित.

४) त्रितालचा ठेका (बराबर, दुगून, चौगुन, तिहाई) आणि प्रस्तुतीतील सर्व रचना टाळी, कालासहित म्हणणे आवश्यक (ताल-क्रिया).

५) त्रिताल मध्ये बाँट (४ पलटे आणि तिहाई).

६) केहरवा किंवा दादरा तालात एक अभिनय गीत प्रस्तुत करणे. गीत पाठ असणे व त्याचा अर्थ माहित असणे आवश्यक

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी तबल्याची साथसंगत / डिजिटल ठेका / मेट्रोनोम किंवा तालाच्या ठेक्याचे ध्वनीमुद्रण वापरणे अनिवार्य.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**प्रमाणपत्र परीक्षा – भाग २**

**एकूण गुण – १२५**

---

**सैद्धांतिक :-** **परीक्षेचा कालावधी – २ तास**

**एकूण गुण – ५०** **किमान गुण – १८**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१) कथक नृत्याचा थोडक्यात इतिहास (उगम, घराणी, परंपरा, वेशभूषा, गुरूंची नावे इ.)

२) व्याख्या लिहा:

आमद, तोडे, तुकडा, ततकार, परण, चक्रदार परण, चक्रदार तोडे, कवित्त, अंग, प्रत्यंग, उपांग, गतभाव, हस्तमुद्रा, ताल.

३) तीनतालची माहिती व तालाच्या ठेक्याची बराबर, दुगुन लिपीबद्ध करणे

४) भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांची नावे व त्यांची राज्ये.

५) कोणत्याही एका कथक गुरूंचे चरित्र थोडक्यात लिहा. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य घराणे, वंशपरंपरा, योगदान, शिष्यांची नावे इ.)

६) कथक नृत्याला साथसंगत करणाऱ्या ५ तबला वादकांची नावे लिहा.

७) खालील असंयुक्त हस्तमुद्रा व त्यांचे उपयोग (फक्त नाव, प्रत्येकी ३ उपयोग)

सर्पशीर्ष, मृगशीर्ष, सिंहमुख, कांगुल, अलपद्म, चतुर, भ्रमर, हंसास्य, हंसपक्ष, संदंश, मुकुल, ताम्रचूड, त्रिशूल, व्याघ्र, अर्धसूची, कटक, पल्ली.

**प्रात्यक्षिक :-** **परीक्षेचा कालावधी - २० मि.**

**एकूण गुण – ७५** **किमान गुण – २७**

१) ताल त्रिताल :

थाट – ४ , परण – २, परण आमद – १, चक्रदार परण – १, रंगमंच प्रणाम - १,

कवित्त – १, तोडे – ४, तिहाई – १, चक्रदार तोडा – १, चक्रदार तिहाई - १,



BVSPA CERTIFICATE DIPLOMA

२) गतनिकास - सीधी गत, मटकी गत, बाँसुरी गत, मोरमुकुट, घुंगट

३) गतभाव – पनिहारी - गोपीचे पाणी भरणे, कृष्णाने घागर फोडणे, गोपीचे रागावणे, कृष्णाचे हसणे, इ.

४) गतनिकास व गतभाव मध्ये वापरल्या गेलेल्या सर्व हस्तमुद्रांची नावे

५) ततकार - त्रितालमध्ये आधी, बराबर, दुगून, चौगुन, आठगुन तिहाई सहित येणे आवश्यक.

६) त्रिताल मध्ये बाँट (कमित कमि चार पलटे आणि तिहाई सहित)

७) झपतालची संपूर्ण माहिती, हातावर ठेका म्हणता येणे आवश्यक (ताल- क्रिया)- बराबर, दुगून, चौगुन, तिहाई सहित येणे आवश्यक.

८) ताल झपताल:

थाट – २, साधा आमद – १, रंगमंच प्रणाम – १, तोडा – १, चक्रदार तोडा – १, परण – १, चक्रदार परण – १, तिहाई – १.

९) आधीच्या परीक्षांपेक्षा सर्व रचना व ततकार वेगळे असणे अपेक्षित. सर्व बोल टाळी, काल देऊन म्हणता येणे आवश्यक.

## सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी तबल्याची साथसंगत / डिजिटल ठेका / मेट्रोनोम किंवा तालाच्या ठेक्याचे ध्वनीमुद्रण वापरणे अनिवार्य.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.

**+-+-+-+**

BVGPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**<u>उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग १</u>**

**एकूण गुण – २००**

---

**सैद्धांतिक :-** **परीक्षेचा कालावधी – ३ तास**

**एकूण गुण – ७५** **किमान गुण – २७**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१) नृत्त, नृत्य आणि नाट्य या नर्तनाच्या महत्वाच्या घटकांची संपूर्ण माहिती.

२) लास्य व तांडव अंग व त्याचे कथक मधील स्थान.

३) अभिनय दर्पणनुसार : ग्रीवाभेद (४ प्रकार), शिरोभेद (९ प्रकार) विनियोगांसहीत.

४) पं. कालका महाराज, पं. बिंदादीन महाराज, पं. हरिहर प्रसाद आणि पं. हनुमान प्रसाद यांचे संक्षिप्त चरित्र. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य,घराणे, वंशपरंपर, योगदान, शिष्यांची नावे इ.)

५) लोकनृत्याची व्याख्या सांगा. भांगडा, बिहू, गरबा, लावणी, घुमर या लोकनृत्यांचे उगमस्थान असलेल्या राज्यांची नावे लिहा.

६) भारतातील कोणत्याही २ भारतीय लोकनृत्यांची सविस्तर माहिती सांगणे. (उगम, वैशिष्ट्य, वेशभूषा, संगीत, वाद्ये इ.)

७) लखनौ आणि जयपूर घराण्यांची वैशिष्ट्ये आणि प्रत्येकी ५/५ ज्येष्ठ नर्तकांची नावे.

८) खालील संयुक्त हस्तमुद्रांचे प्रत्येकी ३/३ उपयोग (अभिनय दर्पणनुसार)
अंजली, कपोत, कर्कट, स्वस्तिक, डोला, पुष्पपुट, उत्संग, शिवलिंग, कटकावर्धन, कर्तरी स्वस्तिक, शकट, शंख, चक्र, सम्पुट, पाश.

९) प्रात्यक्षिक अभ्यासक्रमातील सर्व रचना लिपिबद्ध करणे.
तीनताल, झपताल आणि एकताल

१०) संत मिराबाईंचे चरित्र थोडक्यात लिहिणे. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, योगदान, काव्य/भक्तीरचना इ.)

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक :-** **परीक्षेचा कालावधी - २५ मि.**

**एकूण गुण – १२५** **किमान गुण – ४४**

१) कोणतीही एक वंदना

२) त्रिताल: थाट - ३, परण – ३(यातील १ तिश्र जाती), साधा आमद – १,
परण आमद – ३, चक्रदार परण – २, कवित्त – २, तोडे – २, चक्रदार तोडे – ३,
चक्रदार तिहाई – २.

३) त्रितालमध्ये आधी, बराबर, दुगून, तिगुन, चौगुन, आठगुन करणे व ताल देऊन म्हणणे (ताल-क्रिया).

४) त्रितालात बाँट किंवा चलन यापैकी कोणतेही एक

५) त्रितालात गतनिकास - बिंदी (दागिना), कलाई, घुंगटचे विविध प्रकार

६) गतभाव – माखनचोरी

७) झपताल: थाट – २, आमद – १, तोडे – ३, चक्रदार तोडे – २, परण – २,
चक्रदार परण – २, तिहाई – १, चक्रदार तिहाई – १ कवित्त – १,
ततकार – (बराबर, दुगून, चौगुन आणि तिहाई करणे.)

८) एकताल: थाट – २ , आमद – १, तोडे – २, चक्रदार तोडा – १, परण – १,
चक्रदार परण – १, तिहाई – १, ततकार – (बराबर, दुगून, चौगुन आणि तिहाई.

९) अभिनय : एक भजन (रचनाकाराचे नाव, भजनाचे शब्द व त्यांचा अर्थ माहिती असणे आवश्यक).

१०) प्रात्यक्षिकातील सर्व रचना प्रमाणपत्र परीक्षा -२ पेक्षा वेगळ्या असणे अपेक्षित.
त्यांचा स्तर उच्च प्रमाणपत्र परीक्षेसाठी योग्य असावा.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.

- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

**+-+-+-+**

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

## <u>उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग २</u>

**एकूण गुण – २५०**

---

**सैद्धांतिक :-** **परीक्षेचा कालावधी – ३ तास**

**एकूण गुण – १००** **किमान गुण – ३५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१) कथक नृत्यातील मंदिर परंपरा व दरबार परंपरा यांची माहिती.

२) अ) बनारस घराण्याची माहिती

ब) लखनौ, जयपूर घराण्याची वंशपरंपरा.

३) अ) अभिनय दर्पणनुसार संयुक्त हस्तमुद्रांपैकी खालील मुद्रांची माहिती आणि विनियोग / उपयोग: कीलक, मत्स्य, कूर्म, वराह, गरुड, नागबंध, खटवा, भेरुंड.

ब) अभिनय दर्पणनुसार ८ प्रकारच्या दृष्टीभेदांची विनियोग / उपयोगां सह माहिती.

४) त्रितालचा ठेका आधी १/२, पौनी ३/४ (पाऊण पट), कुआडी १ १/४ (सव्वापट), आडी १ १/२ (दीडपट), बिआडी १ ३/४ (पाऊणे दोनपट) या लयीत लिपिबद्ध करा.

५) अभिनय म्हणजे काय ते सांगून आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक या चारही प्रकारांची सविस्तर माहिती लिहा.

६) जीवनचरित्र लिहा : (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, घराणे, वंशपरंपरा, योगदान, शिष्यांची नावे इ.)

(अ) पं. अच्छन महाराज, (ब) पं. शंभू महाराज,

(क) पं. लच्छू महाराज, (ड) पं. सुखदेव महाराज.

७) प्रात्यक्षिकातील सर्व रचना लिपिबद्ध करणे.

८) तालाच्या दशप्राणांची फक्त नावे. त्यातील जाती व यति विषयी सोदाहरण स्पष्टीकरण करा.

९) श्रीकृष्णचरित्रातील कोणत्याही एका कथेचे सविस्तर वर्णन लिहा.

१०) व्याख्या सांगा : फर्माईशी चक्रदार परण, परमेलू, गणेश परण, तिश्रजाती व चतुश्रजाती परण, तिहाईचे सर्व प्रकार (साधी, चक्रदार, बेदम, गिनती, फर्माईशी)

११) भरतनाट्यम, मणिपुरी, कथकली, ओडिसी या शैलींची खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती :

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

अ) उगम, ब) विकास, क) प्रस्तुतीचा क्रम, ड) साथसंगत, ई) पोषाख, फ) प्रसिध्द नर्तक

**प्रात्यक्षिक :-** **परीक्षेचा कालावधी - २५ मि.**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ५३**

१) श्रीकृष्ण वंदना किंवा शिववंदना

२) ताल त्रिताल: उठान, थाट, आमद, बेदम तिहाई – १, नटवरी तोडे - १ (ता, थै, तत् या शब्दांची रचना), परमेलू – १, गणेश परण – १, फर्माईशी परण – १,ततकार – लडी.

३) एकताल: थाट – ३, परण आमद – १, तोडे – ४, चक्रदार तोडे – २, परण – २,
चक्रदार परण – २, तिहाई – २, कवित्त – १,
ततकार – (बराबर, दुगून, तिगुन, चौगुन आणि तिहाई)

४) रुपक: थाट – २, साधा आमद – १, तोडे – ४, चक्रदार तोडे – २, परण – २,
चक्रदार परण – २, कवित्त – १, तिहाई – २,
ततकार – (बराबर, दुगून, तिगुन, चौगुन आणि तिहाई)

५) झपतालमध्ये ततकार व पढंत - बराबर, दुगून, तिगुन, चौगुन व तिहाई

६) गतनिकास - रुखसार, छेडछाड, आँचल आणि मटकीचे विविध प्रकार

७) गतभाव – कालियादमन

८) 'होरी' काव्यावर अभिनय (रचनाकाराचे नाव, काव्याचे शब्द व त्यांचा अर्थ माहिती असणे आवश्यक)

९) सर्व रचना व क्रमलयी ताल देऊन म्हणता येणे आवश्यक.

सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.
- **अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.**
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- **परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.**
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

**+-+-+-+**

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**<u>पदविका परीक्षा – भाग १</u>**

**एकूण गुण – ४००**

---

**सैद्धांतिक :-** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ३० / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – ७५**

१) उच्च प्रमाणपत्र - २ पर्यंतच्या सर्व व्याख्यांचा अभ्यास.

२) अ) ब्रह्मदेवाकडून नाट्यवेदाची निर्मिती (नाट्योत्पत्तीची कथा)

ब) भरतमुनींनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगांचे वर्णन.

३) अभिनय दर्पणनुसार नायकांचे चार प्रकार स्पष्ट करा -
(धीरोद्धत, धीरललित, धीरप्रशांत, धीरोदात्त) सोदाहरण.

४) नवरस म्हणजे काय ते सांगून प्रत्येक रसाविषयी सविस्तर माहिती.

५) अष्टनायिकांपैकी अभिसारिका, खंडिता, विप्रलब्धा आणि प्रोषितपतिका
या चार नायिकांची सविस्तर माहिती.

६) दशावतारांची माहिती सांगून त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हस्तमुद्रा
लिहा व कोणत्याही एका अवताराची कथा.

७) कथक नृत्याच्या अभ्यासाने "शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास
होतो" हे स्पष्ट करा.

८) प्रात्यक्षिकातील आत्तापर्यंतच्या अभ्यासक्रमातील त्रिताल, झपताल, एकताल, रूपक, धमार, रास आणि गजझंपा या तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – ७५**

१) प्रात्यक्षिकातील आत्तापर्यंतच्या अभ्यासक्रमातील त्रिताल, झपताल, एकताल, रूपक, धमार, रास आणि गजझंपा या तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

२) कथक नृत्यात सादर होणाऱ्या खालील रचनांची माहिती –

होरी, चतरंग, ठुमरी, चैती, कजरी, धृपद, अष्टपदी, त्रिवट, तराणा, सरगम

३) व्याख्या लिहा - त्रिपल्ली, कमाली चक्रदार परण, त्रिभंग, कसक - मसक, भ्रमरी, गिनती.

४) संतकवी सूरदास यांचे जीवनचरित्र. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, योगदान, काव्य/भक्तीरचना इ.)

५) रससिद्धांताची विस्तृत माहिती - स्थायीभाव, भाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव.

६) कथक नृत्यक्षेत्रात नवाब वाजिद अली शाह आणि रायगड चे महाराज चक्रधर सिंह यांचे योगदान.

७) पं. नारायण प्रसाद, पं. जयलाल, पं. गोपीकृष्ण आणि पं. बिरजू महाराज यांचे चरित्र. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, घराणे, वंशपरंपरा, योगदान, शिष्यांची नावे इ.)

८) निबंध - अ) गुरुशिष्य परंपरेचे महत्व, ब) शिष्याचे गुण आणि गुरूबद्दल कर्तव्य,

क) ठुमरी आणि कथक नृत्य

**प्रात्यक्षिक :-** **परीक्षेचा कालावधी - ३० मि**

**एकूण गुण – २५०**

**अ) रंगमंच सादरीकरण –** **एकूण गुण – ७५**

**किमान गुण – ३०**

रंगमंच सादरीकरण २० मिनिटे - (वंदना, ताल आणि अभिनय सहित )
(परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.)

**ब) तोंडी परीक्षा-** **एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१) सरस्वती वंदना / गुरुवंदना / विष्णूवंदना - यांपैकी एक

२) त्रिताल, झपताल व एकताल यामध्ये विशेष तयारी (वैशिष्ठ्यपूर्ण रचना – परमेलू, फर्माईशी रचना, कवित्त, बेदम रचना इ.) (विलंबित मध्य व द्रुत रचना प्रस्तुतीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक)

३) गजझंपा, रास आणि धमार या तालांमध्ये खालील रचना:

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

थाट – ३, आमद – १, तोडे – २, चक्रदार तोडे – २, परण – १,

चक्रदार परण १, कवित्त – १, तिहाई – २, गिनती – १,

ततकार – (बराबर, दुगून, तिगुन, चौगुन आणि तिहाई)

४) गतनिकास - अ) आँचल, ब) सीधी गत

५) गतभाव - द्रौपदी चीरहरण किंवा कोणतीही एक रामकथा.

६) एक तराणा किंवा त्रिवट

७) अभिसारिका, खंडिता, विप्रलब्धा आणि प्रोषितपतिका या नायिका पद / ठुमरी / गतभाव यांद्वारे सादर करणे.

८) संत कवी सूरदास यांचे १ भजन अभिनयाद्वारे सादर करणे

९) सर्व तालांमधील रचनांची टाळी, काल दाखवून (ताल-क्रिया) पढंत करणे. प्रत्येक तालातील एक रचना फक्त ठेक्यावर करणे.

१०) सर्व सांगीतिक रचनांच्या राग व तालांची नावे सांगणे

सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV/SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ

## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**<u>पदविका परीक्षा – भाग २</u>**

**एकूण गुण – ४००**

---

**सैद्धांतिक :-** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ३० / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – ७५**

१) नृत्याचा उगम आणि त्याचा शास्त्रीय स्वरूपापर्यंतचा प्रवास.

२) रामायण, महाभारत, पुराणे यामध्ये नृत्याचे संदर्भ.

३) नायिका भेदांचे सविस्तर वर्णन -

अ) आयु भेदानुसार नायिका : मुग्धा, मध्या, प्रौढा

ब) धर्म भेदानुसार नायिका : स्वकीया, परकीया, सामान्या

क) प्रकृतिनुसार नायिका : उत्तमा, मध्यमा, अधमा

ड) जातिभेदानुसार नायिका : पद्मिनी, चित्रणी, शंखिणी, हस्तिनी

इ) परिस्थितीनुसार नायिका : अष्टनायिका (वासकसज्जा, स्वाधीनपतिका, कलहंतारिता, विरहोत्कंठिता)

४) कुचीपुडी, मोहिनीअट्टम, छाऊ, सत्रिय या शास्त्रीय नृत्याशैलींचे पुढील मुद्द्यांनुसार विवेचन: उगम, विकास, सर्वसाधारण प्रस्तुतीक्रम, साथसंगतीची वाद्ये, पेहराव, प्रसिद्ध ज्येष्ठ नर्तक.

५) लय आणि ताल यांचा उगम आणि त्यांचे कथक नृत्यातील महत्व.

६) नाट्यशास्त्र आणि अभिनय दर्पण यांमधील संयुक्त व असंयुक्त हस्तमुद्रांमधील साम्य व फरक.

७) पंचमसवारी - १५ मात्रा, शिखर - १७ मात्रा, किंवा मत्त - ९/१८ मात्रा या तालात पुढील रचना लिपीबद्ध करा - साधा आमद, परण आमद, तोडा, चक्रदार तोडा, परण, चक्रदार परण, तिहाई वगैरे.

८) "पं. उदयशंकर निर्मित आधुनिक नृत्य" याविषयी सविस्तर माहिती.

९) एकल नृत्यप्रस्तुतीसाठी रंगमंच व्यवस्था, ध्वनी संयोजन, प्रकाशयोजना आणि नेपथ्य यांचे महत्व

१०) फौंडेशन पासुन आत्तापर्यंतच्या सर्व व्याख्या अनिवार्य

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – ७५**

१) कथक नृत्याचा गायन, वादन, साहित्य, चित्रकला आणि शिल्पकला या ललित कलांशी असलेला परस्पर संबंध.

२) भरतनाट्यशास्त्रानुसार खालील संकल्पनांची माहिती :

(अ) धर्मी - लोकधर्मी, नाट्यधर्मी

(ब) वृत्ती - भारती, सात्वती, कैशिकी, आरभट्टी

(क) अभिनय - शारीर, मुखज

३) तिहाईची गरज का निर्माण झाली असावी? ते स्पष्ट करून, खालील तिहाई प्रकारांचे सोदाहरण स्पष्टीकरण दया.

(अ) साधी तिहाई, (ब) चक्रदार तिहाई, (क) गिनती तिहाई,

(ड) बेदम तिहाई, (ई) फर्माईशी तिहाई

४) पं. कुंदनलाल गंगाणी, पं. दुर्गालाल, पंडिता सितारादेवी आणि पंडिता रोहिणी भाटे यांचे चरित्र. (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, घराणे, वंशपरंपरा, योगदान, शिष्यांची नावे इ)

५) तालाच्या दशप्राणांविषयी सविस्तर माहिती.

६) "कथक नृत्यात लोकधर्मी व नाट्यधर्मी या दोन्ही परंपरांचा मेळ साधला जातो" या विधानाबाबत आपले मत स्पष्ट करा.

७) पाठ्यक्रमात झालेल्या सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

८) "शास्त्रीय नृत्यशैली ही इतर नृत्यप्रकारांचा पाया होऊ शकते" ह्या विधानाचे स्पष्टीकरण

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण – २५०** **परीक्षेचा कालावधी - ३० मि.**

**अ) रंगमंच सादरीकरण –** **एकूण गुण – ७५**

**किमान गुण – ३०**

रंगमंच सादरीकरण (२० मिनिटे) (वंदना, ताल आणि अभिनय )
(विलंबित, मध्य व द्रुत लयीतील रचनांचा तालप्रस्तुतीत समावेश असावा.)
(परीक्षेच्या स्तराप्रमाणे रचनांचा दर्जा असावा. प्रात्यक्षिक परीक्षेपेक्षा वेगळया रचना असाव्यात.)

BY SPA CERTIFICATE DIPLOMA

**ब) तोंडी परीक्षा-** **एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१) कोणतीही एक वंदना

२) शिखर (१७ मात्रा), मत्त (९/१८ मात्रा) आणि पंचमसवारी (१५ मात्रा) यात खालील रचना : थाट, आमद, तोडे – २, चक्रदार तोडे – २, परण – २, चक्रदार परण – २, कवित्त – १, तिहाई – २, ततकार - ठेक्याची बराबर, दुगून, तिगुन, चौगुन आणि तिहाई.

३) ततकारमध्ये बाँट, लड़ी, चलन, रेला, कायदा यापैकी कोणतेही दोन कोणत्याही तालात.

४) त्रिताल, झपताल, एकताल, रुपक, धमार यामध्ये प्रत्येकी एक तोडा / परण फक्त ठेक्यावर सादर करणे.

५) गतनिकास - वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण

६) गतभाव - (अ) नवरसांपैकी एका रसावर आधारित

(ब) दशावतारातील एका अवतारावर आधारित

७) फक्त चेहऱ्याद्वारे नवरस दाखविणे

८) वासकसज्जा, स्वाधीनपतिका, विरहोत्कंठिता, कलहंतारिता या नायिका पद/ ठुमरी/ गतभाव याद्वारे सादर करणे.

९) नायिका भेद व्यतिरिक्त कोणतीही एक ठुमरी

१०) सरगम/ चतरंग

११) काव्याच्या एकाच ओळीवर संचारी भाव दाखवणे

१२) (अ) त्रितालच्या लेहऱ्याचे स्वर गाऊन किंवा हार्मोनियमवर वाजवून दाखवणे.

(ब) त्रितालमध्ये भुवया किंवा मान यांची लयबद्ध हालचाल.

१३) परीक्षकांनी दिलेल्या शब्दसमूहाचा वापर करून त्रिताल, झपताल, एकताल, रूपक या तालांत तिहाई बनवणे.

१४) सर्व तालांमधील रचनांची टाळी धरून पढंत आवश्यक (ताल-क्रिया)

सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**<u>उच्च पदविका परीक्षा – भाग १</u>**

**एकूण गुण – ५००**

---

**सैद्धांतिक –** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – २००** **किमान गुण – ४० / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – १००**

१) पाठयक्रमात असलेल्या सर्व तालांमधील रचना व तालाच्या ठेक्याची बराबर, दुगुन, तिगुन, चौगुन आणि तिहाई लिपीबद्ध करणे.

(रास- १३ मात्रा, गजझंपा- १५ मात्रा, बसंत- ९ मात्रा, रुद्र- ११ मात्रा)

२) पाच जाती कोणत्या ते सविस्तर सांगून पाच जाती ५ वेगवेगळया तालात लिपीबद्ध करणे. (एक जाती - एकाच तालात)

३) झपताल आणि त्रितालचा ठेका आधी (१/२), पाऊण (३/४), कुआड (१ १/४), आड (१ १/२), बिआड (१ ३/४) या लयीत लिपीबद्ध करणे.

४) कथक नृत्याची परंपरा आणि सध्या त्याला मिळालेले नवनवीन पैलू यांचे सविस्तर विवेचन

५) आदिवासी नृत्य, ग्रामीण नृत्य, शास्त्रीय नृत्य

६) नौटंकी, तमाशा, रासमंडल या प्रकारांची माहिती

७) कथक नृत्य आणि त्याचे साहित्य याचे सविस्तर विवेचन

८) पं. तिरथराम आझाद, डॉ. पुरु दधिच, पंडिता दमयंती जोशी, पंडिता माया राव यांचे जीवनचरित्र (जन्मतिथी, वैयक्तिक आयुष्य, घराणे, वंशपरंपरा, योगदान, शिष्यांची नावे इ.)

९) कथक नृत्याला साथसंगतीचे महत्व, त्याची आवश्यकता व संगत करणाऱ्या कलाकारांची भूमिका यावर तुमचे मत लिहा.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – १००**

१) वैदिक आणि पुराणकाळातील साहित्यातील नृत्याचे संदर्भ
२) खालील नाट्यशास्त्रीय संकल्पनांची माहिती :

अ) वाद्यांचे प्रकार - तत् , सुषिर, अवनद्ध, घन

ब) रंगमंचाचे प्रकार - त्र्यस्त्र, चतुरस्त्र, वृत्त.

क) करण, अंगहार, चारी, गती, मंडल, स्थानक

३) "कथक नृत्याचा आदर्श वस्तूक्रम" आपले मत स्पष्ट करा. (कार्यक्रम एक तासाचा आहे असे गृहीत धरा)
४) आपण पाहिलेल्या कोणत्याही एका कथक नृत्यप्रस्तुतीची समिक्षा
५) कथक नृत्यकारांना श्रीकृष्ण चरित्राचे महत्व
६) कथक नृत्यासाठी रियाजाचे महत्व
७) नवरस ही संकल्पना व कोणत्याही एका रसाचे सविस्तर विवेचन
८) अष्टनायिकांच्या प्रस्तुतीकरणामध्ये मुग्धा, मध्या आणि प्रौढा (प्रगल्भा) या अवस्थांचा विचार कशाप्रकारे आवश्यक आहे त्याचे सोदाहरण स्पष्टीकरण
९) सर्व तालांमधील सर्व रचना लिपीबद्ध करणे

**प्रात्यक्षिक :-** **परीक्षेचा कालावधी - ४५ मि.**

**एकूण गुण – ३००**

**अ) रंगमंच सादरीकरण –** **एकूण गुण – १२५**

**किमान गुण – ५०**

**रंगमंच सादरीकरण** - (वंदना, ताल आणि अभिनय याची समग्र प्रस्तुती - (२५ ते ३५ मिनिटे)
(विलंबित, मध्य व द्रुत लयीतील रचनांचा तालप्रस्तुतीत समावेश असावा.)
(परीक्षेच्या स्तराप्रमाणे रचनांचा दर्जा असावा. प्रात्यक्षिक परीक्षेपेक्षा वेगळया रचना असाव्यात.)

**ब) तोंडी परीक्षा-** **एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१) कोणतीही एक वंदना/ स्तुती. (तालबद्ध असणे आवश्यक)

२) त्रिताल व झपताल मध्ये उच्च पदविका दर्जाची प्रस्तुती (समग्र).

३) रुद्रताल (११ मात्रा) किंवा बसंत ताल (९ मात्रा) या तालांमध्ये खालील रचना प्रस्तुती
(कोणत्याही एका तालात)

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

थाट | परण - २
आमद -१ | चक्रदार परण - २
तोडे - २ | कवित्त - १
चक्रदार तोडे - २ | तिहाई - २

ततकार- ठेक्याची बराबर, दुगून,तिगुन, चौगुन, तिहाई

४) रास, गजझंपा, शिखर, पंचमसवारी, मत्त यात प्रत्येकी एक वैशिष्ठ्यपूर्ण रचना. उदा. परमेलू, फर्माईशी परण, दर्जेदार परण, जातीपरण इ. (कोणतेही एक कोणत्याही एका तालात)

५) परीक्षकांनी दिलेल्या शब्दसमूहावर नवीन रचना/ तिहाई बांधणे.

६) ततकार फक्त ठेक्यावर सादर करणे. (चलन, रेला, कायदा वगैरे)

७) सर्व तालांतील रचना फक्त ठेक्यावर सादर करणे.

८) एक अष्टपदी किंवा धृपद (यापैकी एक).

९) विभिन्न तालात जातींवर आधारित रचना प्रस्तुती

१०) चैती, दादरा, झूला, सावन यापैकी एक रचना

११) गतभाव - कांचनमृग किंवा श्रीकृष्ण तुला

१२) सर्व रचनांची पढंत आवश्यक

१३) एखादी आधुनिक कथा किंवा घटना किंवा परीक्षकांनी दिलेले कथानक गतभावाद्वारे सादर करणे.

## सुचना –

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+



BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**भारती विद्यापीठ**

**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

**नृत्य (कथक) अभ्यासक्रम**

**उच्च पदविका परीक्षा – भाग २**

**एकूण गुण – ५००**

---

**सैद्धांतिक –** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – २००** **किमान गुण – ४० / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र - १** **एकूण गुण – १००**

१) कथक नृत्यातील मंदिर, दरबार आणि रंगमंचीय परंपरेचे सविस्तर विवेचन

२) नाट्यशास्त्रातील नृत्याध्यायांची थोडक्यात माहिती

३) नाट्यशास्त्रानुसार रससिद्धांत

४) कथक नृत्यातील लखनौ, जयपूर व बनारस घराण्याची वैशिष्ठ्ये

५) कथक नृत्याच्या संरचनेमध्ये होत असणाऱ्या नवीन प्रयोगांविषयी सविस्तर माहिती

६) नृत्यसंरचनेची मूलभूत तत्त्वे व त्याची उदाहरणे

७) संत तुलसीदास, संत कबीर आणि एका प्रादेशिक भक्तीरचनाकाराचे चरित्र व त्यांच्या एखाद्या काव्यरचनेचे कथक नृत्याच्या अनुषंगाने विवेचन

८) गायन, वादन आणि नर्तन परस्परावलंबित्व याचा तौलनिक अभ्यास

९) पाठ्यक्रमातील सर्व तालांच्या ठेक्याची क्रमलय व फर्माईशी परण, कमाली चक्रदार परण, कवित्त व तिश्रजाती आणि मिश्रजाती तिहाई लिपीबद्ध करा.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – १००**

१) आत्तापर्यंतच्या पाठ्यक्रमातील सर्व व्याख्या सोदाहरण विवेचनासह स्पष्ट करणे.

२) स्पष्ट करा :

अ) मुघल काळात  झालेला कथकचा विकास

ब) मुघल काळात झालेले कथकचे अधःपतन

३) पं. भातखंडे व पं. पलुस्कर यांच्या काललेखन पद्धतीची तुलना एकच रचना दोन्ही पद्धतीनुसार लिहणे.

४) सध्याच्या काळातील कथक नृत्याला परंपरेचे बंधन - आपले मत स्पष्ट करा.

५) अभिनयदर्पण मधील पात्रलक्षण आणि नर्तकीलक्षण याचे संस्कृत श्लोक व त्याचे विवेचन

६) इतर भारतीय शास्त्रीय नृत्यशैलींमधील प्रत्येकी एका गुरुचे चरित्र

७) खालील संज्ञांची माहिती

१. घुमरिया, २. लोम-विलोम, ३. धुरन-मुरन, ४. लाग डांट, ५. उरप-तिरप-सुलप, ६. संच, ७. जमनका, ८. पोहोपाजुरी, ९. उरमई, १०. उघटत.

८) अभिनयदर्पणनुसार देव हस्ताचे वर्णन

९) कथक नृत्यात घुंगरुंचे महत्व

१०) कथक नृत्यात 'पढंत' चे महत्व

११) सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे

**प्रात्यक्षिक :- एकूण गुण – ३००** **परीक्षेचा कालावधी - ४५ मि.**

**अ) रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण – १२५**

**किमान गुण – ५०**

**रंगमंच सादरीकरण** - (वंदना, ताल आणि अभिनय याची समग्र प्रस्तुती - (२५ ते ३५ मिनिटे)
(विलंबित, मध्य व द्रुत लयीतील रचनांचा तालप्रस्तुतीत समावेश असावा.)
(परीक्षेच्या स्तराप्रमाणे रचनांचा दर्जा असावा. प्रात्यक्षिक परीक्षेपेक्षा वेगळया रचना असाव्यात.)

BvSPA CERTIFICATE DIPLOMA

**ब) तोंडी परीक्षा -** **एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१) गणेशस्तुति, दुर्गा स्तुति, राम स्तुति ( कोणतीही एक )

२) चौताल व धमारमध्ये पखवाजाच्या वैशिष्ठ्यपूर्ण रचना (किमान प्रत्येकी ५/५)

३) धृपद आणि लमछड कवित्त

४) गतभाव - रामायण, महाभारत किंवा भागवतातील एखादी प्रभावी कथा

५) पाठ्यक्रमातील रास, गजझंपा/ पंचमसवारी, शिखर, मत्त, बसंत / लक्ष्मी या तालातील वैशिष्ठ्यपूर्ण रचना व कोणत्याही एका तालात ततकारमध्ये बराबर, दुगुन, तिगुन, चौगुन दाखविणे.

६) पं. बिंदादीन महाराजांची एक ठुमरी

७) अष्टनायिकांचा विशेष अभ्यास.

८) कोणत्याही ५ रचना वेगवेगळ्या तालांत ठेक्यावर करणे आवश्यक.

९) ततकारवर प्रभुत्व. फक्त ठेक्यावर रेला, कायदा, चलन वगैरे सादर करणे.

१०) त्रिताल, झपताल, रूपक या तालांचे ठेके तबल्यावर वाजविणे व त्या तालांसाठी हार्मोनिअमवर लेहरा वाजविणे आवश्यक.

११) दमदार पढंत आवश्यक

१२) एकूण प्रभाव

**सुचना –**

- सर्व रचना हातावर टाळी व कालासहित म्हणता येणे (ताल-क्रिया) आवश्यक.
- तबला व हार्मोनियमची साथ या परीक्षेसाठी अनिवार्य आहे.
- साथसंगत करणाऱ्या कलाकारांची अनुपलब्धी असल्यास केवळ भारताबाहेरील विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रित संगीत (तालरचना तबला/ डिजिटल ठेका/मेट्रोनोम बरोबर व अभिनयाच्या रचना) वापरण्याची मुभा असेल. मात्र त्यासाठी संबंधीत केंद्रप्रमुखाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.
- नृत्य प्रस्तुतीत पढंत आवश्यक.
- अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक.
- आधीच्या परीक्षेतील व्याख्या परीक्षकांनी विचारल्यास विद्यार्थ्यांच्या तयार असाव्या.
- परीक्षेत सादर केलेल्या नृत्यरचनांचा दर्जा परीक्षेच्या पातळीला योग्य असा असावा.
- परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक व साथीदार यांच्याशिवाय इतर कुणीही हजर असू नये.
- परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA






५ वा मजला, स्कूल ऑफ परफॉरमिंग आर्टस, नवीन इमारत,
भारती विद्यापीठ शिक्षण संकुल, एरंडवणे, कोथरूड, पौड रोड, पुणे
४११०३८

अध्यापन कार्यालय : ०२० - २९९९६९६
अभ्यासक्रम संदर्भातील माहिती : +९१ ९३७३३३६३२३

Website : http://spa.bharatividyapeeth.edu
Email : bvspa.pune@gmail.com
bvduspa_official bvduspa